लोकमत – ०२/०५/२००८

# 'उपेक्षितांच्या शिक्षणाची जबाबदारी विनाअनुदानित संस्थांनी घ्यावी'




पुणे : देशभरातील ९१ टक्के विद्यार्थी महाविद्यालयात जाऊ शकत नाहीत. अशा उपेक्षितांच्या शिक्षणाची जबाबदारी उच्चशिक्षण देणाऱ्या विनाअनुदानित शिक्षण संस्थांनी घेतली पाहिजे. तरच जगाच्या प्रगतीचे दरवाजे भारताला खुले होतील, असे मत केंद्रीय मनुष्यबळ विकास राज्यमंत्री मोहम्मद अली अश्रफ फातमी यांनी आज व्यक्त केले.

'विनाअनुदानित शिक्षण संस्थांची वाटचाल' या विषयावर आयोजित केलेल्या चर्चासत्राचे उद्घाटन आज फातमी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. अशा शिक्षण संस्था सुरू होऊन पंचवीस वर्षे झाली त्यानिमित्त माईर्स एमआयटीने संत ज्ञानेश्वर सभागृहात हे चर्चासत्र आयोजित केले होते. संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर,

शिक्षणतज्ज्ञ डॉ. डी. वाय. पाटील, माजी खासदार विठ्ठलराव जाधव, डॉ. बुधाजीराव मुळीक यावेळी उपस्थित होते.

माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी विनाअनुदानिक शिक्षण संस्थांचे रोपटे लावले. त्याचा आता देशभर विस्तार झाला आहे, असा संदर्भ देऊन फातमी म्हणाले की, केवळ शैक्षणिक प्रगतीमुळे युरोप, जपान, चीन व अमेरिकेसारखे देश प्रगती करू शकले. शिक्षणामुळेच जगाचे दरवाजे उघडतात. दुर्दैवाने आपल्याकडे माध्यमिक पातळीवरच गळतीचे प्रमाण कमी आहे. आपल्याला बराच लांबचा पल्ला गाठायचा आहे.

हे काम केवळ सरकारचे नाही. खासगी क्षेत्रानेही त्यात पुढाकार घेतला पाहिजे. साधनसामग्रीचा विचार करता आपल्याकडे लोकसंख्या अधिक आहे. म्हणूनच लोक परदेशात जाऊ लागले. दोनशे वर्षांपूर्वी याची सुरुवात झाली. त्यावेळी युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया किंवा न्यूझिलंडमध्ये भारतीय गेले नसते तर आज त्यांची अवस्था गंभीर झाली असती. मध्यपूर्वेकडे आज तब्बल पन्नास लाख भारतीय राहतात. मलेशियात अठरा टक्के लोक भारतीय वंशाचे आहेत. नव्याने शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनीही आता अन्य देशात स्थायिक व्हायला हवे. माहिती तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे अनेक देश आता भारताशी करार करू लागले आहेत. पुणे आणि बंगळूर या शहरांनी मोठी देणगी शिक्षण क्षेत्राला दिली आहे. त्याचे अनुकरण देशभर व्हायला हवे. दरवर्षी चार लाख अभियंते भारतात तयार होता. त्यांचा दर्जा सुधारण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. कित्येक विद्यार्थी महाविद्यालयापर्यंत पोहोचतच नाहीत. त्यांना साक्षर करण्यासाठी सर्व शिक्षा अभियान हे उत्तर आहे.

डॉ. भटकर यांनी, स्वातंत्र्याच्या शताब्दीवर्षात भारत प्रथम क्रमांकाचे सत्ताकेंद्र बनेल, असा विश्वास व्यक्त केला. ते म्हणाले की, आणखी बारा वर्षात आपण चीनला मागे टाकू. अर्थात तशी प्रगती करण्याची जबाबदारी ही अभियंत्यांची आहे. त्यांच्यासमोरही नवी आव्हाने आहेत. जेमतेम पंचवीस टक्के इंजिनियर्सना नोकऱ्या मिळतात. आता आपण ब्रिटिश मानसिकता सोडून देऊन सिंगापूर, मलेशियासारख्या देशात महाविद्यालये सुरू केली पाहिजेत. नॅनो तंत्रज्ञानाने क्रांती झाली आहे. सुईच्या

टोकावर अनेक पुस्तके राहू शकतील, असे तंत्र विकसित होत आहे. अशा परिस्थितीत नैतिकतेच्या शिक्षणावरही आपल्याला भर द्यावा लागेल. तरच भ्रष्टाचाराची कीड नाहीशी होईल. पंचवीस वर्षात विनाअनुदानित संस्थांचे प्रमाण पंचवीस टक्यांनी वाढले. इंजिनिअर्सची गुणवत्ता इतकी चांगली आहे की लवकरच आपले अभियंते अमेरिकेसारख्या देशातील अणुऊर्जा केंद्रेही चालवू लागतील. पुढील वर्षी टेलिकॉमच्या क्षेत्रात आपला पहिला क्रमांक असेल. महासंगणकाच्या उत्पादनात आपण आघाडीवर असू. आपली खरेदीशक्तीही वाएत आहे. राजीव गांधी, इंदिरा गांधी आणि वाजपेयी यांच्या दूरदृष्टीमुळे संगणकाच्या क्षेत्रात आपल्याला चांगले दिवस दिसत आहेत, यावेळी डॉ. डी. वाय. पाटील, डॉ. बुधाजीराव मुळीक, विठ्ठलराव जाधव यांची भाषणे झाली. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या मुलांना विनामूल्य शिक्षण देण्याची जबाबदारी विनाअनुदानित संस्थांनी घेतली पाहिजे, असे मत या वक्त्यांनी व्यक्त केले. डॉ. विश्वनाथ कराड यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एल. के. क्षीरसागर यांनी आभार मानले. प्रा. सुधीर राणे यांनी सूत्रसंचालन केले.